<u>नागरीकांची सनद</u>

कार्यालय,

संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,

महाराष्ट्र राज्य पुणे- 411 005

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन

---

महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 9 नोव्हेंबर, 1995 नुसार मंत्रालय स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग असा नवीन मंत्रालयीन प्रशासकीय विभाग निर्माण करण्यात आला आहे. त्यानुसार भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहे.

यंत्रणेचे मुख्यालय संचालनालय म्हणून पुणे येथे असून त्यांचे अधिनिस्त कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या 6 महसुली विभागात उपसंचालकांची विभागीय कार्यालये असून त्यांच्या नियंत्रणाखाली त्या महसूल विभागातील जिल्हे आहेत. या यंत्रणेची 34 जिल्हयात जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालये कार्यरत आहेत.

शासन अधिसुचना दिनांक 14 नोव्हेंबर, 2000 नुसार विंधण विहिर व वायु संपिडक सुरुंग कार्यक्रम जिल्हा परिषदेकडे वर्ग झाल्यामुळे गट-क व गट-ड मधील अभियांत्रिकी कर्मचारीवृंद व यंत्र सामुग्री भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडून राज्यातील सर्व जिल्हा परिषदेकडे हतांतरित करण्यात आली आहेत. तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडील भूवैज्ञानिकांची 168 पदे जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आली आहेत. शासनाकडील पदांच्या आढाव्यानुसार दिनांक 04.02.2005 व 26.05.2016 च्या शासन निर्णयानुसार यंत्रणेच्या योजना राबविण्यासाठी गट-अ, ब, क, व ड ची मिळून 1551 पदे मंजुर आहेत.

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची कार्यकक्षा-**

राज्यातील भूजल सर्वेक्षण विषयक माहिती प्राप्त करुन त्याचा सूक्ष्म अभ्यास करुन, शेतकऱ्यांना व जनतेला भूजल विषयक मार्गदर्शन करुन त्यांचे राहणीमान उंचविणे, त्याचबरोबर पिण्याचे शुध्द पाणी शाश्वतपणे उपलबध करुन देण्यासाठी सर्वेक्षण, स्थळनिश्चिती व आवश्यक उपाययोजनांची लोकसहभागातून अंमलबजावणी ही प्रमुख कामे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे आहेत. यामध्ये जिल्हयातील भूजलाची उपल्बधता, भूजलाची गुणवत्ता, जलवेधशाळेच्या माध्यमातून विविध परिमाणांची माहिती जिल्हातील एकूण भूजल पुनर्भरण, भूजल उपसा, शिल्लक भूजल व भूजल पातळी यांचा अभ्यास करुन पाणलोटांची वर्गवारी निश्चित करणे, अतिशोषित व शोषित पाणलोटांतील गांवे अधिसूचित व शिफारस करणे, जिल्हयातील भूस्तरांचे भूभौतिक गुणधर्म प्राप्त करणे व विश्लेषण करणे, पर्जन्यमान व भूजल पातळीचा तुलनात्मक अभ्यास करुन संभाव्य पाणी टंचाई सदृश्य परिस्थितीचा अहवाल तयार करणे, राजयातील भूजल संपत्तीत वाढ होणेकरिता विविध पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रमाला, मार्गदर्शन करणे इत्यादी तांत्रिक माहितीचा समावेश आहे. याशिवाय जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विंधन कामाचे संनियंत्रण व तांत्रिक मार्गदर्शन, विंधनयंत्रे व इतर

सयंत्राच्या दुरुस्ती देखभाली करिता मार्गदर्शन करणे, स्त्रोत बळकटीकरण करण्यासाठी पुनर्भरणाच्या पारंपारिक व अपारंपारिक उपाययोजना राबविणे व स्त्रोत विकसीत करण्याकरिता मार्गदर्शन करणे, भूजल गुणवत्तेचा अभ्यास करुन समायोजित करणे व सल्ला देणे याही कामाचा समावेश आहे.

उपभोक्तांसाठी पुरविण्यात येणाऱ्या सर्व सेवा जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयामार्फत पुरविण्यात येतात.

1. सार्वजनिक पिण्याच्या पाण्यासाठी उध्दभव विहिरी /विंधन विहिर सर्वेक्षण करणे.
2. सिंचन विहिरींच्या अर्थसहाय्यीत बँक प्रकरणांसाठी सर्वक्षण करणे
3. स्थानिक स्तरावर भूजल सर्वेक्षण
4. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत् पाणी पुरवठा विहिरींचे सर्वेक्षण
5. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम 2009 अंतर्गत् जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या प्रकरणांचे सर्वेक्षण करणे व तांत्रिक सल्ला देणे.
6. जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त वाळू उत्खनन प्रकरणांचे सर्वेक्षण करणे.
7. भूभौतिक प्रकरणांचे सर्वेक्षण करणे.
8. खाजगीरित्या पाण्याचे रासायनिक व जैविक पृथ:करण करुन देणे.
9. भूजल उपभोक्ता गटास आवश्यक शासकीय शुल्क प्राप्त झाल्यानंतर माहिती पुरविणे.
10. उपलब्ध पिण्याच्या पाण्याच्या कमी क्षमतेच्या विंधन विहिरींचे जलभंजन करुन पाणी क्षमता वाढविणे

भूजल सर्वेक्षण करणेकरिता भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे 34 जिल्हांमध्ये (पालघरसह) वरिष्ठ भूवैज्ञानिक यांची कार्यालये कार्यरत आहेत तसेच 6 महसूली प्रादेशिक विभाग स्तरावर उपसंचालकांची 6 कार्यालये कार्यरत आहेत. संचालनालयामार्फत उपरोक्त नमुद केलेल्या कामांचे सनियंत्रण व पर्यवेक्षण केले जाते. संचालनालय स्तरावरील प्रकरणांशी जबाबदार असलेल्या कर्मचारी अधिकारी इत्यादी बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | उपभोक्ता / गटास आवश्यक भूजलानुषंग्रिक सर्व माहिती पुरविणे | वरिष्ठ भूवैज्ञानिक (जलविज्ञान प्रकल्प) | 30 दिवस | उपसंचालक, (जविप्र) |

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| 2. | दरवर्षी निरिक्षण विहिरींच्या पाणी पातळींच्या नोंदीच्या अभ्यासावरुन संभाव्य पाणी टंचाई अहवाल तयार करुन प्रसिध्द करणे. | वरिष्ठ भूवैज्ञानिक, (सर्वेक्षण) | दरवर्षी नोव्हेंबर, फेब्रुवारी, एप्रिल व जून पहिल्या आठवडयात | सहसंचालक , भू.स.वि.यं.,पुणे |
| 3. | शासन सेवेत गट-क (राज्यस्तरीय) ड या संवर्गात नव्याने नियुक्त् करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेची कार्यवाही करणे, तसेच शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अ, ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सरळसेवा भरती/पदोनत्तीने नियुक्ती आदेशाप्रमाणे कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करणे. | 1. प्रादेशिक उपसंचालकस्तरीय निवड मंडळ (गट-क व ड)<br>2. संचालनालय स्तरावरील राज्यस्तरीय निवड मंडळ (राज्यस्तरीय गट-क करिता) | शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार | संचालक, भू.स.वि.यं., पुणे |
| 4. | केंद्र शासनाच्या माहितीच्या अधिकार, अधिनियम 2005 अंतर्गत सुविधाबाबत | जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक | शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार | अपिलिय अधिकारी तथा अति. संचालक |
| 5. | जनतेच्या सर्वसामान्य तक्रारी दाखल झाल्यास करण्यात येत असलेली सुविधा | सहसंचालक/ प्रशासन अधिकारी | शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार | संचालक, भू.स.वि.यं., पुणे |
| 6. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 अंतर्गत सुविधा<br>1. विंधन विहिर सर्वेक्षण<br>2. वाळू उत्खनन सर्वेक्षण<br>3. भूजल सर्वेक्षण प्रमाणपत्र देणे | जिल्हा वै.भू.वै. कार्यालयातील कनिष्ठ भूवैज्ञानिक/सहाय्यक भूवैज्ञानिक | 7 दिवस<br>7 दिवस<br>30 दिवस | प्रथम अपिल- वरिष्ठ भूवैज्ञानिक<br><br>व्दितीय अपिल- उपसंचालक |

आवेधन विभागाकडील कामे-

1. जिल्हा परिषद स्थित विंधन यंत्राच्या रुपये 5,000/- पेक्षा जास्तीचा खर्चाकरिता 22151881 लेखाशिर्षाअंतर्गत अनुदान मागणी आणि वितरणाचे नियोजन, दुरुस्तीबाबत मार्गदर्शन करणे.
2. विंधन विहिर खुदाई आणि तद्नुषंगिक बाबींची दर निश्चिती करणे व सर्व जिल्हा परिषदांना अवगत करुन देणे.

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 7. | यंत्रसामुग्रीचे निर्लेखन व लिलावाव्दारे विल्हेवाट लावणे | वरिष्ठ खोदन अभियंता | नियोजनात्मक कामे असल्यामुळे तातडीने पार पाडण्यात येतात. त्यामुळे याला कार्यकृतीचा कालावधी लागू नाही | सहसंचालक (अभियांत्रिकी) |
| 8. | विधनयंत्रे कामासाठी भाडयाने लावणे करिता दर विश्लेषण करणे व जिल्हा परिषदेला विंधनयंत्रे लावण्याबाबत मार्गदर्शन करणे. | वरिष्ठ खोदन अभियंता (मु) | नियोजनात्मक कामे असल्यामुळे तातडीने पार पाडण्यात येतात. त्यामुळे याला कार्यकृतीचा कालावधी लागू नाही | सहसंचालक (अभियांत्रिकी) |
| 9. | पाण्याचे नमुन्यांचे रासायनिक व जैविक तपासणी करुन पृथ्थकरण करणे | उपसंचालक कार्यालयातील सहाय्यक रसायनी | शुल्क भरलेनंतर 15 दिवस | संबंधित विभागाचे उपसंचालक |

संचालक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-05